विशेष दिवाणी दावा क्र.८७/२०१०

## निशाणी ११३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी त्याच्या विरुध्द दिनांक ११.९.२०१८ रोजी पुरावा बंद असा झालेला आदेश रदद होवुन मिळण्यासाठी केला आहे.

२. प्रतिवादीने अर्जावर म्हणणे देवुन या अर्जास लेखी हरकत घेतली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला.

४. वादी गैरहजर राहिल्याने दिनांक ११.९.२०१८ रोजी त्याचे विरोधात पुरावा बंद असा आदेश झाला आहे. वादीचे जवळचे नातेवाईक अक्कलकोट जेऊर येथे मयत झाले असल्याने त्यांचे सर्व विधिकरीता यातील वादी हे परगावी गेले होते असे वादीचे कथन आहे. दाव्यातील वादाबाबत गुणवत्तेवर निकाल करण्याकरीता वादी यांना सदर दाव्याचे कामी साक्षीदार घेण्याची संधी देणे योग्य राहील असे माझे मत आहे. सबब वादी विरुध्दचा उपरोक्त आदेश रदद करणे योग्य राहील. परिणामी मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी ११३ मंजुर केला आहे.

२. दिनांक ११.०९.२०१८ रोजीचा वादी विरुध्दचा 'पुरावा बंद' असा आदेश रदद केला आहे.

(रा.अ.सासने)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

दिनांक २४.०९.२०१८

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original order

a) Name of the stenographer KONDEKAR B.R.

b) Court : C.J.S.D. Pandharpur

c) order signed by P. O. on : 24/09/2018

d) order uploaded on : 24/09/2018